MARATHI

भॉक!

जेव्हा माझी बहीण गेली...

ऋचा झा आणि गौतम बेनेगल

एकलव्य

भॉक!

जेव्हा माझी बहीण गेली...

ऋचा झा आणि गौतम बेनेगल
मराठी अनुवाद सुजाता देशमुख

एकलव्य

EDICAL
YAZDI BAKERY AND STORE
ESTABLISHED 1921

TONY'S GARA
47th Church Lane / B
AUNTY PERRIN'S DANCE CLASSES
INRI

माझ्या बहिणीला, म्हणजेच झोयाला इस्पितळात ठेवलं होतं, त्याच रात्री ती माझ्या स्वप्नात आली.



“झोया आपल्यातून आता कायमची गेली.”
दुसऱ्या दिवशी सकाळी आईनं मला सांगितलं.

मी ओक्साबोक्शी रडले.

“बाळा, झोया आपल्याबरोबर नेहेमी असेल,”
आई म्हणाली.

पण ती खोटं बोलत होती. मला माहिती होतं.

त्या दिवशी दुपारी पाऊस पडला. मला माझी झोया
दिसल्याचा भास झाला.

पण विजेसारखी ती बघता बघता दिसेनाशी झाली.

बरोबरच आहे. मरून गेलेली बहीण माझ्या आवडत्या
छत्रीभोवती चिखलाचा राडा, कशी करणार!

किंवा माझ्या थाळीतल्या इडल्या कशी बरं पळवणार.

किंवा मला मागून ‘भॉक’ कशी करणार ना...

शाळेतल्या अगदी फक्त आमचं गुपित असलेल्या
गुप्त ठिकाणीसुद्धा ती आता ते करणार नाही.



सगळं शांत शांत झालंय.



झोया आजूबाजूलाच आहे, आपल्यातच आहे, असं आई म्हणते खरी.

पण ते खोटंय. मला माहिती होतं.

आई आणि ब्रूनोही मला सोडून तिच्याकडे जातील अशी मला रोज रात्री भीती वाटते.

“ब्रूनो, मला सोडून कध्धी जायचं नाही, बरं का...” एके दिवशी मी ब्रूनोला बजावलं.

त्यानंही मला वचन दिलं.

काही आठवडे उलटले. झोयाची जिवलग मैत्रीण धारा घरी आली. ‘मी गृहपाठ करतेय म्हणून मला वेळ नाही,’ असं मी तिला सांगितलं.

हे मी आपलं मनात रचून सांगितलं. तिनं झोयाच्या कुठल्याच वस्तूंना हात लावलेला मला नको होता.

दुसऱ्या दिवशी धारा पुन्हा घरी आली.

“धारा, तू येत जाऊ नकोस. तू माझ्या झोयाची जागा कधीच घेऊ शकणार नाहीस” मी तिला म्हणाले.



पण धारा तशीच उभी राहिली.

आईनं तिला मिठीत घेतलं, तशी मला रागच आला. ती माझी आई आहे, तिची नाही.

झोयाच्या वाढदिवसाला धारानी तिला एक
पुस्तक भेट दिलं होतं. ते मी फाडून टाकलं.



झोपायच्या आधी आईला गोष्टीचं पुस्तक
अजिबात वाचू दिलं नाही.

दुसऱ्या दिवशी मला परत झोयाचा भास झाला. पण पुन्हा बघता बघता ती नाहीशी झाली.

झोया कायम आपल्या आजूबाजूला वावरत असते, आपल्या मनात-हृदयात असते असं आई म्हणते. तिचं असणं आपण समजून घ्यायला हवं.

“आई तू वेडी आहेस,” मी जोरात ओरडले. “आणि खोटं बोलतीयेस. मेलेले कध्धीच आपल्याबरोबर असू शकत नाहीत.”

आईच्या कुशीत तोंड खुपसून मी हमसून हमसून रडले.

तिच्या ओल्या पदरानं तिनं माझे गाल पुसले. “नूरी, अगं बाळा, तुझी बहीण तुला कधीच सोडून जाणार नाही. कायम तुझ्याबरोबरच असेल.”

नाही, ती असणार नाही. मला माहीत होतं.
ती असूच शकत नाही.

“नूरी! नूरी! नूरी!”

झोया? मला बोलावते आहे?

बाहेर अजूनही अंधार होता.



आणि बाहेर दिवाणखान्यात
मला झोया दिसली.

माझी झोया!

आम्ही खूप हसलो.
लोळालोळी केली. नाचलो.
धडपडलो. ब्रूनोही उड्या
मारीत सुटला.

धारानं तिचा नेहेमीसारखा
विदुषकी चेहेरा केला, तशी
झोयाला खुदकन हसू फुटलं.



व्हीडियो संपेपर्यंत उजाडलं होतं.
पावसाला सुरुवात झाली होती.

आणि अहा, मला इंद्रधनुष्य दिसलं.

मी बाहेर धाव घेतली.

“भॉक!” मी पुन्हा झोयाचा आवाज ऐकला.

दर वेळेप्रमाणे ती विजेसारखी दिसेनाशी होईल
अशी मला भीती वाटली.



पण नाही झाली या वेळेस!

माझ्या बोटांत तिची मऊ, नरम बोटं
गुंफली गेली.

शाळेची वेळ होईपर्यंत आम्ही एकत्र खूप
धमाल, दंगामस्ती केली.

मला जायचं नव्हतं, पण आई म्हणाली
तिथेही मला माझी झोया सापडेलच.

त्या दिवशी मी पन्नास हजार इडल्या खाल्ल्या.
आणि खूप खूप माझ्या डब्यात भरून घेतल्या.

पण त्या माझ्यासाठी नव्हत्या.

धारा एकटी बसलेली होती.

मला तिच्यापासून लपायचं होतं.

“अंह, नाही” झोया कुजबुजत मला पुढे ढकलत म्हणाल्यासारखं वाटलं.

“धारा, मला माफ कर” अखेर मी म्हणाले.

धारानी माझ्याकडे पाहिलं नाही. ती काहीवेळ पुतळ्यासारखी बसून राहिली आणि मग रडायला लागली.

“मला झोयाची आठवण येते”, ती मुसमुसत म्हणाली.

“मला पण” मी म्हणाले.

आणि मग आम्ही दोघी हुंदके देऊन देऊन रडलो. माझी झोया पण रडत होती का?

त्या दिवशी संध्याकाळी आम्ही लपंडाव खेळत असतांना ब्रूनो आणि मी एकत्र लपलो. धारावर डाव आला होता. ती आम्हाला शोधू लागली.

आमच्याबरोबर माझ्या बाजूला झोयासुद्धा होती. आवाज न करता आम्ही खुदखुदत राहिलो.

धारा आम्हाला शोधून शोधून दमली, तशी तिनं तिचा विदुषकी चेहरा केला. मोठ्यांदा फुटणारं हसू मी दाबलं.

“भॉक!” धारा अचानक पाठीमागून आली आणि आम्हाला दचकवलं.

“तू म्हणजे अगदीच भॉक भैताड आहेस,” मी वैतागून म्हणाले. “पण जगातली सगळ्यात महान विदूषक आहेस.”

आणि आम्ही हसलो काय, गडबडा लोळलो काय,
नाचलो काय आणि पडलो काय.

आमच्याबरोबर झोयासुद्धा.

हो, खरंच. माझी झोयासुद्धा.



EDICAL
YAZDI BAKERY AND STORE

TONY'S GARA
47th Church Lane /
AUNTY PERRIN'S DANCE CLASSES
INRI

भॉक! जेव्हा माझी बहीण गेली...
BHAUK! JEWHA MAJHI BAHIN GELI...

कथा: ऋचा झा
रेखाचित्र: गौतम बेनेगल
मराठी लेआउट: पूजा के मेनन
अनुवाद: सुजाता देशमुख
सम्पादन: मिलिंद परांजपे

मराठी अनुवाद: एकलव्य फाउंडेशन, मे 2023
हि पुस्तक Attribution-Non-Commercial-NoDerivatives 4.0 International (CC BY-NC-ND 4.0) लायसन्सच्या अंतर्गत आहे ज्याचे विवरण https:creativecommons.org/licecses/by-nc-nd/4.0/ वर उपलब्ध आहे.
वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या पुस्तकाचा उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखक आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कुठल्याही उपयोगासाठी प्रकाशकांच्या मार्फत लेखकांशी अवश्य संपर्क करा.

रेखाचित्र © गौतम बेनेगल, मे 2023

Published as *Boo! When My Sister Died* in the English language by Pickle Yolk Books, and *मेरी ज़ोया चली गई!*, by Eklavya Foundation.

पराग इनिशिएटीव्ह, टाटा ट्रस्टच्या अर्थसाहाय्यातून प्रकाशित

प्रकाशन: मे 2023 (2000 प्रती)
कागद: 100 gsm मैपलिथो पेपर आणि 220 gsm एफबीबी (मुखपृष्ठ)
ISBN: 978-93-94552-96-8
मूल्य: ₹ 100.00

प्रकाशक: एकलव्य फाउंडेशन
जमनालाल बजाज परिसर
जाटखेड़ी, भोपाल - 462 026 (मप्र)
फोन: +91 755 297 7770-71-72
वेबसाइट: www.eklavya.in; ईमेल: books@eklavya.in

मुद्रक: आदर्श प्रा लि, भोपाल; फोन: +91 755 255 5442

ऋचा झा : या एक उत्साही लेखक आणि प्रकाशक आहेत. 'पिकल योक बुक्स' च्या **(Pickle Yolk Books)** चित्रकथांसाठी त्या स्वतंत्रपणे काम करतात. त्यांच्या आतापर्यंत बारा चित्रकथा प्रकाशित झाल्या आहेत. युवा वाचकांच्या साहित्य संग्रहाचं संपादनही त्यांनी केलं आहे. प्रतिष्ठेच्या विविध पुरस्कारांमध्ये, 'क्रॉसवर्ड अवॉर्ड', 'पब्लिशिंग नेक्स्ट इंडस्ट्री अवॉर्ड' आणि 'फिक्की पब्लिशिंग अवॉर्ड' यांसाठी त्यांची अनेक पुस्तकं निवडली गेली आहेत.

पुस्तक वाचनाबरोबरच नवनव्या स्थळांना भेटी द्यायला त्यांना आवडतं.

गौतम बेनेगल : १९६५ मध्ये कोलकात्यात जन्मलेल्या गौतम यांना लहानपणापासून चित्रकलेबद्दल प्रेम आणि आपुलकी होती. ते अवघ्या सोळा वर्षांचे असल्यापासून विख्यात चित्रपट दिग्दर्शक आणि संपादक सत्यजित रे यांच्या 'संदेश' या मासिकात रेखाटनं आणि लेखन करू लागले होते. स्वत: सत्यजित रे यांनीच त्यांना ही संधी दिली होती.

त्यांच्या लेखनात लहान मुलांसाठी रचलेल्या कविता, लोककथा, शिक्षण इत्यादी विषयांचा कायम समावेश होता.

भारतीय संस्कृती आणि परांपरांबद्दल माहिती मिळवणं आणि त्यातलं वैविध्य कलांच्या माध्यमांतून प्रकट करणं गौतम यांना अतिशय प्रिय होतं. गौतम यांचं २०२१ साली निधन झालं.

त्या दिवशी रात्री माझी बहीण झोया इस्पितळात असतांना मला तिचं स्वप्न पडलं.

“झोया आपल्याला सोडून कायमची गेली” आईनं दुसऱ्या दिवशी सकाळी मला सांगितलं.

मी हमसाहमशी रडले.

झोया कायम आजूबाजूला असेल, असं आई म्हणाली.

खोटं बोलतेय ती, मला माहिती होतं.

नूरीच्या झोया नावाच्या बहिणीचा मृत्यू झाल्यानंतर तिचं जग शांत होऊन जातं. आता आपली बहीण कायमची गेली आहे हे तिला माहिती आहे.

पण, ‘झोया आपल्यातच असणार’ या आईच्या काय खुळचट थापा? आणि नूरीला एकटं सोडायला तयार नसलेल्या झोयाच्या जिवाभावाच्या मैत्रिणीचं – धाराचं – काय करायचं?

भॉक! हरवलेल्या, मिळवलेल्या प्रेमाची कोवळी गोष्ट.

मूल्य: ₹ 100.00

Pickle Yolk Books

parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS

एकलव्य

9 789394 552968